VOL- IX ISSUE- VII JULY 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

# ज्ञानेश्वरी वाचनाची : प्रासंगिकता

**डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे**
मराठी विभाग प्रमुख,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

अध्यात्मिक क्षेत्रातील चक्रवर्ती परमपूज्य संत निवृत्तीनाथ यांच्यापासून नाथ संप्रदायाशी, शैवपंथाशी वैष्णव, भागवत, वारकरी पंथाचा, परंपरेचा संबंध आला. वारकरी संप्रदायाचा पाया संत ज्ञानेश्वरांनी घातला. ज्ञानेश्वरांना सातशे वर्षे होऊन गेले. कृष्ण नामाचा मंत्र गहिनीनाथांनी निवृत्तीनाथांना दिला आणि वारकरी संप्रदाय उदयाला आला. स्वतः ज्ञानेश्वर नाथपरंपरेतील आहेत. शैव आणि वैष्णव परंपरा या अतिशय गुण्यागोविंदाने, तर कधी विरोधाच्या प्रसंगात एकमेकांच्या मदतनीस म्हणून काम करू लागल्या. शैव व वैष्णव या दोन परंपरा इतक्या कट्टर, इतका पराकोटीचा द्वेष पसरला होता की, शैवांना विष्णूचे नाव सहन होत नाही. तर वैष्णवांना शिवाचे नाव सहन होत नाही. परंतु असा विरोध पसरवणारे लोक ना शिव ना धड वैष्णव असतात. उदाहरण द्यायचे म्हटले तर जमीन जरी सारवायची म्हटली तर उभी सारवायची नाही. तर ती आडवी सारवायची चोळी फाटली तर सर्वजण ती चोळी शिवली म्हणायचे, तर वैष्णोपंथी चोळीला टाका घातला किंवा चोळी वैष्णवली म्हणायचे. अशा वातावरणात ज्ञानेश्वरांनी शैव व वैष्णव परंपरेत प्रभाव निर्माण करून एकता साधली. नाथपरंपरा ज्ञानेश्वरांनी जपली आणि जोपासली आहे. ज्ञानेश्वरांच्या उत्तरकालात नाथपरंपरा राहिली. “नादरी एकतेने नाव तेची शैव का वैष्णव” ती अनन्यता पाळणे म्हणजे त्या परंपरेचा द्वेष करायचे नाही. याच विचाराने संत ज्ञानेश्वरांनी नाथपरंपरा महाराष्ट्रभर पसरवली. ज्ञानेश्वरीच्या अगोदरचे वांड्मय गोरक्षनाथांचे ‘सिद्धांतपद्धती’ फक्त होते. ज्ञानदेवांच्या नंतर जी परंपरा दिसते त्यात ज्ञानेश्वरी हा प्रमाण ग्रंथ ठरला. ज्ञानेश्वरीचे वर्णन करत नाहीत अशी आज जगात एकही परंपरा नाही. संत एकनाथ दत्त संप्रदायी पण नाथांनी ज्ञानेश्वरीचे वर्णन केले. जर ज्ञानेश्वरीचे कोणी वर्णन करत नसेल तर आम्ही त्याला संत म्हणत नाही. आपण ज्ञानेश्वरीचे वर्णन केले पाहिजे. म्हणून संत जनाबाई सांगतात. “वाचावी ज्ञानेश्वरी। डोळा पहावी पंढरी ।।१।। ज्ञान होय अज्ञानासी। ऐसा वर त्या टीकेसी।।२।। ज्ञान हो मुढा। मूर्ख अति त्या दगडा।।३।। वाचील जो कोणी। जनी त्यासी लोटांगणी।।४।।” संत जनाबाईंचा हा अभंग आहे म्हणजे संत जनाबाई माहेश्वरी आहेत. केवळ मुखातून केलेली टीका म्हणून मर्यादित अर्थाने आपण बघत नाही, केवळ विचाराचा आदर करत नाही, केवळ विस्ताराचा ग्रंथ नाही टीकेचा ग्रंथ नाही. ज्ञानेश्वरीतील गीता बाजूला केली तरी ज्ञानेश्वरी स्वतंत्र ग्रंथ राहतो. ‘गीताविन रंगू दावी’ गीतावरहित माझा ग्रंथ रंग दाखवील. भगवद्गीतेत 700 श्लोकात सांगितलेले तत्त्वज्ञान ज्ञानेश्वरीत 9000 ओव्यांत ज्ञानेश्वरांनी सांगितले आहे. येथे तुलना करायची नाही, तर विलक्षणत्व, वैलक्षण्य सांगायचे आहे. जनाबाई म्हणते वाचावी ज्ञानेश्वरी ही ज्ञानेश्वरी वाचली की, ब्रह्मज्ञान प्राप्त होते. जगद्गुरु शंकराचार्यांनी सूत्राची संगती लावून 555 ब्रह्मसूत्राच्या आधारे भाष्य लिहिले या ग्रंथात सूत्राची संगती वर्गीकरण करून आचार्यांनी लावली. त्यातून परब्रम्ह स्वरूप प्राप्त करून घेणे ही ब्रह्मसूत्र टीका, कल्पतरू आहे. परंतु आचार्यांनी सगळ्या ग्रंथातून जे भगवद्गीतेत चिंतन आले आहे. तेवढेच ब्रह्मसूत्रात मांडले. परंतु ज्ञानेश्वरी याच्यापुढे जाऊन सांगते म्हणून वाचावी ज्ञानेश्वरी। डोळा पहावी पंढरी।। ज्ञानेश्वरीला एक टीका ग्रंथ समजू नका ज्ञानेश्वरीला विविध नावं आहेत. ‘ज्ञानेश्वरी’ हे नाव ज्ञानेश्वरांनी दिले नाही, तर संत जनाबाईंनी दिले आहे. संत नामदेव ‘भावार्थदीपिका’ आहे म्हणतात. संत नामदेवांनी ज्ञानेश्वरीला वेगवेगळी नावे दिली आहेत. ज्ञानेश्वरीच्या संदर्भातला नामदेवांचा अभंग सुद्धा किती सुंदर आहे ज्ञानराज माझी योग्यांची माऊली। जेणे निगमवल्ली प्रकट केली।। गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी। ब्रह्मानंद लहरी प्रकट केली।। अध्यात्म विद्येचे दाविलेसे रूप। चैतन्याचा दीप उजळला।। छपन्न भाषेचा केलासे गौरव। भवार्णवी नाव उभारिली।।

श्रवणाचे मिसे बैसावे येऊनि। सामराज्य भुवनी सुखी नांदे।।
नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानेश्वरी। एक तरी ओवी अनुभवावी।।

जनाबाई म्हणाली, नामदेवाने ज्ञानेश्वरीला किती सुंदर नावे दिली आहेत. निगमवल्ली आता वेदाची वेल आहे का? वेलीच्या रूपाने ज्ञानेश्वरांनी प्रकट केले. तुम्हीच ठरवा काय म्हणायचे ते ब्रह्मानंद लहरी अहा. अशा ज्ञानेश्वरीचे केवळ वाचनच न होता तिच्यामध्ये सांगितलेल्या तत्त्वज्ञानाचा अनुभव घेतला पाहिजे. संत नामदेव म्हणतात, तसा ज्ञानेश्वरीच्या सागरातल्या ब्रह्मानंद लहरीवर अरुढ झालं पाहिजे किंवा तो ब्रह्मानंद चाखला पाहिजे. असं म्हणता म्हणताच जनाबाई त्या ब्रह्मानंदात न्हाऊ लागली म्हणून वाचावी ज्ञानेश्वरी। डोळा पहावी पंढरी।। पंढरपुरात आल्यावर सर्व संतांचे दर्शन तर झालेच परंतु मुख्य म्हणजे योग्यांची, ज्ञानाची, भक्तांची माऊली असलेल्या ज्ञानेश्वर महाराजांचे ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून जवळून दर्शन झाले. म्हणून जनाबाई सांगतात डोळा पहावी पंढरी जनाई पुढे सांगू लागली, ‘‘मला वाटले की हा ग्रंथ ‘ज्ञानाची ईश्वरी’ आहे.’’ ईश्वर शब्दाचा अर्थ करताना ईशनशील ज्यात आहे तो ईश्वर. ईशान म्हणजे नियमन. नियमन म्हणजे कीर्तन करणे, मृदंग वाजवणे, टाळ वाजवणे, मांडी घालून बसणे, हरिपाठ म्हणणे, मी तुमच्यासमोर बसून ग्रंथ बघून बोलतो म्हणजे नियमन. जीवन जगण्याचे माणूस म्हणून घेण्याचे नियमन. प्रत्येकाला आधार आहे. या जगताचे जो नियमन करतो तो ईश्वर. कोणते कर्म करायचे, कोणते फळ द्यावयाचे हे ठरवतो तो ईश्वर. वारा कधी सुटावा, पाऊस कधी पडावा, पावसाने कधी प्रवाहित व्हावे, समुद्राने आपली मर्यादा कधी ओलांडावी, ज्ञानेश्वरांची जीवसृष्टी किंवा भूतसृष्टी ही संकल्पना जी. ए. पेट्राइड्स यांनी सांगितलेल्या पर्यावरण शास्त्राच्या जवळ जाणारी आहे. निसर्गसृष्टीतील विविध घटकांचे चक्र हे अव्याहतपणे चालू आहे की, जे जीवसृष्टीच्या हितावर नियंत्रण ठेवून त्याच्या प्रसाराचे, निर्मितीचे व उत्क्रांतीचे नियमन करते. हे ज्ञानेश्वरांनी पुढील ओव्यांमधून स्पष्ट केले आहे. आकाशे सर्वत्र वसावे। वायुने नावभरी उगे नसावे पावके दहावे। वर्षावे जळे।। (ज्ञा. ९-२८०) पार्वती बैसका न संडावी। समुद्री रेखा नोलांडावी। पृथ्विया भुतें वाहवी। हे आज्ञा माझी।। (ज्ञा.९-१८१८,२) प्रतिपाळा म्हणोनि भूते हन सृजावी। कां सृजीली इये करणी न येती आघवी। आमुचिया अंगा (ज्ञा-९-१२१) जो हा भूतग्रामू आघवा। असे प्रकृतीअधीन पांडवा जैसी बिजाचिया वेलपालवा। समर्थ भूमी।। (ज्ञा ९-११७) अर्जुना हा सर्व प्राणिमात्रांचा समुदाय प्रकृतीच्या आधीन आहे जशी बिजाला वेली पाने उत्पन्न करण्यास भूमीच समर्थ आहे. म्हणून प्राणी उत्पन्न करावेत किंवा त्यांचे प्रतिपालन करावे. या सर्व खटपटीचा संबंध माझ्याशी येत नाही. आकाशाने सर्वत्र राहावे वाऱ्याने क्षणभरच निवांत बसू नये, अग्नीने जळावे, पाण्याने वर्षाव करावा] पर्वताने आपले स्थान सोडू नये, समुद्रांनी आपली मर्यादा ओलांडू नये व पृथ्वीने सर्व प्राण्यांचा भार सहन करावा हे सर्व माझ्या आज्ञेने चालले आहे. मी बोलविले तर वेद बोलतो, मी चालविले तर सूर्य चालतो व जगाचा चालक प्राण तो सुद्धा मी हलविला तर हलतो मीच आज्ञा दिली की काळ जगाचा ग्रास करतो. अर्जूना ही सर्व ज्याची आज्ञा मानतात असा जो सर्व शक्तिमान जगाचा चालक तो मीच आहे आणि आकाशाप्रमाणे साक्षी रूपाने राहणारा तोही मीच आहे. असे भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात की, हे सर्व माझ्या आज्ञेने चालते संत तुकाराम म्हणतात, ‘‘चाले हे शरीर। कोणाचीये सत्ता। कोण बोलवितो हरिविना।। देखवी एक नारायण। तयाचे भजन चुकू नको।। माणसाची देव चालली अहंता। मी चि एक कर्ता म्हणो नये।। वृक्षाची ही पाहणी हाले। त्याची सहंता। राहिली अहंता मग कोठे।। तुका म्हणे विठोबा भरला संबाही। तया उणे काही चराचरी।। या सर्वांचे नियमन करणारा तो ईश्वर नियमन करणारी सत्ता म्हणजे ईश्वरी ज्ञानाचे नियमन करते ती ज्ञानेश्वरी कृपेशिवाय ब्रह्मज्ञान होणार नाही कुणाला ज्ञान द्यावे. हे ज्ञानेश्वरांनी ठरवावे हे जनाबाई म्हणते वाचावी ज्ञानेश्वरी। डोळा पहावी पंढरी।। ज्ञान होय अज्ञानासी। ऐसा वर त्या टीकेसी।। ज्ञान होई मुढा। मूर्ख अती दगडा।। वाचील जो कोणी। जनी त्यासी लोटांगणी।। ज्ञान होई मूढा। मूर्ख अती दगडा।। दगडाने दगडाला मदत केली तर या दगडाला ही ज्ञान प्राप्त होईल दगडाचा खांब करून मंदीर होईल. दगडालाही ज्ञानेश्वरी देईल. ज्याला वाटते मला ज्ञानेश्वरी कळली असे वाटत असेल तर नक्की समजायचे त्याला काहीच कळले नाही. पण ज्यांनी मला ज्ञानेश्वरी कळाली नाही म्हटले की, समजायचे त्याला समजली. समजा स्वतःला शहाणा विद्वान पंडित समजत असला तरी एका ओवीचा तरी अर्थ लावू शकणार नाही. परंतु अति मूर्ख दगडाला ज्ञानेश्वरी ज्ञान देऊन जाईल. ही ज्ञानेश्वरीच्या प्रथम अध्यायात ओवी क्रमांक 75 ते 77 मध्ये ज्ञानेश्वर सांगतात. ये-हवी तरी मी मूर्खू। जरी जाहला

अविवेकू। तरी संतकृपादीपकू। सोज्वळु असे।। (७५) लोहाचे कनक होय। हे सामर्थ्य परिसींचे आहे। कीं मृतही जीवित लाहे। अमृतसिद्धी (७६) जरी प्रकटे सिद्धसरस्वती। तरी मुकयाहि आथी भारती। एथ वस्तु सामर्थ्यशक्ती नवल कायी।।(७७) एरवी मी खरोखर मूर्ख, अज्ञानी असून अविचारच करीत आहे. तथापि पुन्हा संतांचा कृपारुपी दीप मार्गदर्शक आहे. हे मी माझे भाग्य समजतो. परिसाच्या सामर्थ्याने लोखंडाचे सोने होते किंवा मेलेल्या माणसाला अमृत पाजवले की, तो जिवंत होतो. अथवा सरस्वती प्रसन्न झाली तर मुकादेखील बोलू लागतो तेव्हा मी गीता सांगतो. यात नवल नसून ते श्री गुरुचे महात्म्य आहे. असे नम्रपणे ज्ञानदेव सांगतात. तसेच अशीच सम ओवी ज्ञानेश्वरीतील अध्याय पाचवा ओवी क्रमांक 26 ते 28 मध्ये संत ज्ञानेश्वर म्हणतात, ‘‘ए-हवी तरी पार्था। जे मूर्ख होती सर्वथा। ते सांख्ययोगुसंस्था जाणती केवीं।।२६।। सहज ते अज्ञान। म्हणोनी म्हणती ते भिन्न। ए-हवी दीपाप्रती काई आनान। प्रकाशु आहाती?।।२७।। पै सम्यक येणें अनुभवे। जीहीं देखिलें तत्व आघवे। ते दोहोंतेही ऐक्यभावे। मनिती गा।।२८।। एरवी अर्जुना, जे अज्ञानी आहेत ते सांख्ययोग व कर्मयोग कसा समजू शकतील. ते स्वभावताच मूर्ख असतात म्हणून या दोन मार्गांना भिन्न समजतात. एरवी प्रत्येक दिव्याचा प्रकाश वेगवेगळा असतो का? तथापि ज्यांनी चांगल्या प्रकारे अनुभव घेऊन परब्रम्हाचे तत्व झालेले आहे ते हे दोन्ही योग एकच आहेत असे मानतात. बघा आपल्याला ओम नमोजी आद्या। वेद प्रतिपाद्या। जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा ही पहिली मंगलचरणातील ओम हाच परमात्मा आहे. हे समजण्यास कित्येक वर्ष जातील आपण पारायणाला बसलो तर कोण चिकू आणेल, कोण पेढा ठेवतो हे वाट पहात पारायण करतो मग कशी ज्ञानेश्वरी कळेल ज्ञानेश्वरी वाटते तितकी सहज सोपी नाही. गीतेवरची टीका वाचायची त्याला सोपी आहे. पण ज्ञानेश्वरी प्रत्यक्षात वाचावयाची त्याला सोपी नाही. ‘अद्वैतसिद्धी पंचमिथ्यात्वं’ हे ग्रंथ केवलानंद सरस्वती हे वाईच्या प्रज्ञा पाठशाळेचे आहेत. त्यांनी लिहिलेले हे संस्कृत मधील ग्रंथ वाचले तर कळतील पण त्यांनी अद्वैतसिद्धी ग्रंथावर लिहिलेले मराठी भाषेतील ‘अद्वैतसिद्धी’ अविष्कार ही भाष्य समजायला खूप कठीण आहे. तर संस्कृत भाषेतील सोपे; परंतु मराठीत लिहिलेले खूप कळायला कठीण आहे. तसेच ज्ञानेश्वरी बाबत घडते गीतेवरच्या इतर टीका पहा व नंतर लिहिलेले भाष्य ग्रंथ पहा शंकराचार्यांचे गीताभाष्यापेक्षा ज्ञानेश्वरी ही टीका अधिक सरस आहे. मी तुम्हाला एक प्रश्न विचारतो एखादा वक्ता ग्रंथ निर्माण करतो आणि सांगतो मग तो ग्रंथ कोणाला कळेल तुमच्याकडून सरळ उत्तर येईल व त्याला कळतो तो श्रोत्याला तेवढा कळणारा नाही. जगद्गुरु शंकराचार्य भगवान शंकराचे अवतार होते. संत ज्ञानेश्वर भगवान विष्णूचे अवतार आहेत. महाविष्णूचा अवतार सखा माझा ज्ञानेश्वर गीता बोलणारे कृष्ण आणि गीता ऐकणारे शंकर आहेत. संत ज्ञानेश्वर आणि शंकराचार्य शंकर आहेत. यांच्यातील कमीत कमी ५०० वर्षाचे अंतर असेल. ज्ञानेश्वराच्या काळात शंकराचार्य असते तर सरळ ज्ञानेश्वरी वाचून म्हटले असते माझे गीता भाष्य वाचू नका तर ज्ञानेश्वरी वाचा कारण ज्ञानेश्वरी हा ग्रंथ वक्ता व श्रोता या दोघांसाठी लिहिलेला ग्रंथ आहे. ह.भ.प. श्री चैतन्य महाराज देगलूरकर वर्धानंद भारती म्हणतात, ‘‘संस्कृत आणि हिंदी भाषा जाणणाऱ्या विद्वानांना मराठी भाषा वाचता येत नाही आणि समजतही नाही हे मोठे दुर्दैव आहे.’’

जर्मन-गटे हा भारतात आला आणि त्याने संस्कृत भाषा शिकली. आपल्याकडील कालिदासाचे संस्कृत साहित्य वाचला आणि कालिदासाचे सर्व वांड्मय डोक्यावर घेऊन आनंदाने नाचू लागला. मी म्हणतो मराठी भाषेतील अमृतालाही पैजा जिंकायला लावणारी ज्ञानेश्वरी वाचला असता तर आयुष्यभर ज्ञानेश्वरासमोर साष्टांग दंडवत घालत पडून राहिला असता एवढी वाङ्मयाची व्यापकता आणि उंची आहे.

ज्ञानेश्वरी केवळ सारस्वताचा एक दागिना आहे असे आपल्याकडचे विद्वान म्हणतात हे आपले दुर्दैव आहे. असे अनेक सरस्वताचे दागिने आहेत. त्यापैकी ज्ञानेश्वरी हा एक दागिना नाही तर ज्ञानेश्वरी हेच सरस्वतीचे सारस्वताचे मंगळसूत्र आहे. आता मंगळसूत्र काढून फिर म्हणावे सरस्वतीला कोण किंमत देते ते बघू असे चैतन्य महाराज म्हणतात. ज्ञानेश्वरी काय सामान्य ग्रंथ वाटतो. आपल्याला बऱ्याच जणांना मी प्रश्न केला ज्ञानेश्वरी कोणी लिहिली तर उत्तर मिळाले तुकारामांनी लिहिली एवढे सुद्धा तिच्या नावावरून तरी माहीत नाही म्हणजे किती कठीण व लाजिरवाणे वाटते. म्हणून संत जनाबाई म्हणते, मुडाला सुद्धा ज्ञान देईल त्यामुळे वाचावी ज्ञानेश्वरी येथे आहे हे ते विलक्षणत्व आहे. ज्ञानेश्वरी मनोभावे भजावी। ज्ञानेशाते

सद्भावे भजावे।। जो जे वांछिल त्यास ते लाभावे। ऐसा 'ज्ञानेश्वरी' चा महिमा थोर।। ज्ञानेश्वरीच्या वाचनाने अंत:करणात प्रेमाचा पाऊस पडतो. 'आनंदाचे आवारू मांडू जगा' या प्रतिज्ञेत माऊलींनी ज्ञानेश्वरी लिहिली. माणूस सुखी संपन्न व्हावा हा माऊलींचा ध्यास ज्ञानेश्वरी हे भक्तीशास्त्र आहे. माऊली भक्तीला एका बाजूने कर्मयोगाचा तर दुसऱ्या बाजूने ज्ञान योगाचा आधार देते. ज्ञानेश्वरीच्या वाचनाने मन शुद्ध होतं राग, लोभ मत्सर नष्ट होतात. प्रेम उचंबळून येतं माणुसकीचा गहिवर दाटून येतो. संत नामदेव म्हणतात, 'नामा म्हणे श्रेष्ठ ग्रंथ ज्ञानदेवी। एक तरी ओवी अनुभवावी।। ब्रह्मानंदाची एक लहर, तरंग ज्ञानेश्वरी असेल तर ज्ञानोबाराय काय असतील? थोडासा विचार करा. सर्व सुखाची लहरी। ज्ञानाबाई अलंकापुरी शिवपीठ जुनाट। ज्ञानाबाई तेथे मुगुट।। वेदशास्त्रे देती ग्वाही। म्हणती ज्ञानाबाई आई।। ज्ञानाबाईचे चरणी। शरण एका जनार्दनी।। ज्ञानेश्वरांना वेदशास्त्राने आई म्हणावे अजून काय हवे? वेद कोणालाही सहजासहजी आई म्हणत नाहीत कारण ज्ञानोबा इतका निराभिमानी आणि विनम्र की, त्यांनी ज्ञानेश्वरी ग्रंथात आठव्या अध्यायाच्या शेवटी म्हटले, किंबहुना तुमचे केले। धर्मकीर्तन हे सिद्धी नेले। येथ माझे जी उरले। पाईकपण।। म्हणजे ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीला 'धर्मकीर्तन' म्हटले आता धर्माचे कीर्तन म्हणजे काय? हा धर्म अर्जुनाचा का? भगवंत विष्णूचा का? वक्त्यांचा का? श्रोत्यांचा का? धर्म, तर सर्वांचा असतो क्षत्रियांचा धर्म, वैष्णवांचा धर्म ज्ञानेश्वरी सांगते धर्माचे कीर्तन पुन्हा येथे षष्ठी तत्पुरुष झाला. धर्माचा अर्थ जो धारण केला जातो तो धर्म धृ हा धातू आहे. देवतेची उपासना करणे, विशिष्ट वेश धारणा करणे, विशिष्ट संतांना व महापुरुषांना मानणे, एखाद्या उपासना पंथाचा प्रचार करणे यालाच लोक धर्म असे समजतात हे चुकीचे आहे. जगातील प्रत्येक वस्तूचा धर्म आहे आणि माणूस तर धर्माशिवाय जगू शकत नाही. धर्म ही अफूची गोळी आहे. शांतीपर्वाच्या 109 व्या अध्यायात धर्माची व्याख्या दिली आहे. धारणाधर्म इत्याहुर्धर्मेण विधृत: प्रजा:। य: स्याध्दारणसंयुक्त: स धर्म इति निश्चय:।। धारण करतो म्हणूनच त्याला धर्म म्हणतात. धर्मानेच लोकांना धारण केले आहे. धारण करण्याच्या गुणांनी जो युक्त असेल तोच धर्म असा सिद्धांत आहे. धर्माने राज्य चालतात धर्माधिकारीच प्रजासह व्यवस्थित जीवन जगतात. प्रत्येक वस्तूला प्राणभूत असलेल्या तत्वाला त्या वस्तूचा धर्म असे म्हणतात. वाहणे हा पाण्याचा धर्म, जळणे व जाळणे हा अग्नीचा धर्म आहे. जगातील यद्ययावत सगळ्या गोष्टींचे धर्म ओळखणे आणि त्यांचा आपल्या सुखासाठी उपयोग करणे यातच मानवाच्या अनेक प्रगतीचे रहस्य दडलेले आहे. अशा या धर्माचा विरोध करणे म्हणजे प्रगतीचा विरोध करणे होय. ज्याला धर्म नाही तो माणूस नाही. अभ्युदयाची निश्चिती करतो तो धर्म. धर्म एव हटो हंती धर्मो रक्षती रक्षिती। तस्माद धर्मो न हंतव्यो मा नो धर्मो।। (हटोवधूत) जो पुरुष धर्म का नाश करता है, उसी का नाश धर्म कर देता है, और जो धर्म की रक्षा करता है उसकी धर्म भी रक्षा करता है। इसलिये मारा हुआ धर्म कधी हमको न मार डाले इस भय से धर्म का हनन अर्थात त्याग कभी करना न चाहिए। आपण धर्माच्या आधारे जीवन जगतो. ज्ञानोबाराय, तुकोबाराय यांच्या आधारे धर्म जगतो. धर्माला स्वत:ची सत्ता नाही. संत कधी धर्माने वागत नाहीत, तर संत ज्ञानोबा तुकोबा वागतात तो धर्म ठरतो. पुण्यवंतांच्या आधारे धर्म जगतो त्याची आम्ही धर्मकीर्तन करतो. जे कर्म संपत्ती ते कीर्तन वारकरी सांगतात, टाळकरी भजन करतात, टाळ वाजवतात, मृदंग वाजवतात, भजन गातात म्हणून कीर्तन, भजन म्हणजे पुण्यवानाची ही सेवा आहे. ज्ञानदेव नम्रतेची भावना ठेवून कीर्तन करतात. या ज्ञानदेवाच्या कीर्तनाला निवृत्तीनाथ सोपानदेव मुक्ताबाई ही भावंड म्हणजे सगुणरुपातले ब्रह्मा विष्णू महेश आणि मुक्ताई आदिशक्ती. हे संत मंडळी होते यावर जनाबाई म्हणते, सदाशिवाचा अवतार। स्वामी निवृत्ती दातार। महाविष्णूचा अवतार। सखा माझा ज्ञानेश्वर।। ब्रह्मा सोपान तो झाला। भक्त आनंद वर्तला।। आदिशक्ती मुक्ताबाई। दासी जनी लागे पायी।। म्हणून ज्ञानदेवांनी त्यांना महेशाचिया मूर्ती म्हटले आहे. दुसऱ्या एका अभंगात ज्ञानेश्वरांची स्तुती करताना जनाबाई म्हणते भाव अक्षराची गांठी। ब्रह्मज्ञान गोमटी।। ते हे माया ज्ञानेश्वरी। संत जना माहेश्वरी।। ज्ञानेश्वर मंगळ मुनी। सेवा करी दासी जनी।। त्यांच्या काळातील श्रोतेही अलौकिक होते. हे सर्व माझे काही नाही तर निवृत्तीनाथांच्या कृपेचे फळ आहे. असे ज्ञानेश्वर अतिशय नम्रपणे सांगतात. कीर्तनकारच माझ्यासमोर बसले आहेत. मला अधिक सांगायची गरज नाही. कर्माचे कुठे कीर्तन असते का? कर्माचे अपूर्व फल निर्माण होते आणि फल सुद्धा संपून जाईल. जे कर्म संपत्ती त्याचे नसते कीर्तन शाश्वत आहे. नित्य आनंद स्वरूप असते त्याचे कीर्तन केले जाते. म्हणून जनाबाई म्हणते, वाचावी ज्ञानेश्वरी.

ज्ञानेश्वरी वाचून काय मिळणार आहे? असा प्रश्न आपल्या सर्वांच्या मनात निर्माण होणे स्वाभाविक आहे. माणसाला कर्म करताना प्रयोजन हवे. फळ हे हित कळाल्याशिवाय कर्म आपण करत नाही. अभ्युदयाचे कीर्तन नाही भृतहरी कर्माचे तीन प्रकार सांगतात १) कर्माचा प्रारंभ कसा करतात की बघू फळ मिळेल ते मिळेल म्हणून कर्म करतात २) काही जण फळाची अपेक्षा ठेवून कर्म करतात ३) प्रारब्धात होईल ते होईल म्हणून काही कर्म करतात. माणसाला काहीतरी प्रयोजन हेतू दिसले पाहिजे काही प्रवचन कीर्तन करून ऐकून आपल्याला काहीतरी नवीन मिळते. म्हणून आपण ऐकतो हे प्रयोजनच आहे. काहीजण घरी किरकिर आहे, कीर्तनात चांगली झोप लागते म्हणून ऐकतात हेही प्रयोजन आहे. मंदबुद्धीचा मनुष्य सुद्धा प्रयोजन ठेवूनच कर्म करतो. अकर्मात ठेवून केलेली क्रिया जगात नाही. ज्ञान होई अज्ञानासी। ऐसा वर त्या टीकेसी।। असे संत जनाबाईच उत्तर देते. ज्ञान होईल मुढा। मूर्ख अति दया दगडा।। म्हणून ज्ञानेश्वरी वाच. तुम्ही ज्ञानेश्वरी वाचाल तर माझ्यासारखी संतही तुमच्या चरणावर दंडवत घालतील असे जनाबाई म्हणते. वाचील जो कोणी। जनी त्यासी लोटांगणी।। ज्ञानेश्वरीच्या चौथ्या अध्यायात ओवी क्रमांक 01 मध्ये म्हणतात - आधिची वेवेकाची गोठी। वरी प्रतिपादी श्रीकृष्ण जगजेठी। आणि भक्ताराजू किरीटी। परिसत असे।। आधीच विवेकाची कथा, त्यात श्रीकृष्ण जगजेठी कथा सांगणारा आणि भक्तशिरोमणी अर्जून ऐकणारा. आपल्याला शब्द कळतात; पण शब्दाच्या मागील भाव कळत नाही. म्हणून नाथ महाराज सांगतात भाव धरूनिया वाची ज्ञानेश्वरी। कृपा करी हरी तयावरी।। स्वमुखे आपण सांगे तो श्रीविष्णू। श्री गीता हा प्रश्नु अर्जुनेंसी।। तेचि ज्ञानेश्वरी वाचे वदता साचे। भय कळीकाळाचे नाही तया।। एका जनार्दनी संशय सांडोनी। दृढ धरी मनीं ज्ञानेश्वरी।।

आता सांगा ज्ञानेश्वरी वाचण्याचा हेतू काय? का वाचावी? या प्रश्नांचे उत्तर एकच आहे. जनाबाईंनी सांगितले म्हणून वाचावी. कारण का तर मोठ्याने सांगितलेले ऐकावे त्यांनी म्हणतील तसे वागावे. त्यात आपले कल्याण व हीत आहे. त्यात आपले कल्याण, हित कशात आहे. हे सगळेच मोठे झालेले आपल्या हिताचे सांगणार नाही. पण संत सांगतात, आपणच आपल्याला कोण आहोत हे ओळखत नाही. पण ज्ञानोबाराय, तुकोबारायांना आपले हित कशात आहे हे कळते. म्हणून संत तुकाराम सांगतात आता तरी पुढे हाची उपदेश। नका करू नाश आयुष्याचा।। सकाळच्या पाया माझे दंडवत। आपुले चित्त शुद्ध करा। हित ते करावे देवाचे चिंतन। करूनिया मन एकविध।। तुका म्हणे लाभ होय तो व्यापार। करा काय फार शिकवावे।। ज्याचे तोची जाणे। मी मापाडे तुका म्हणे।। असे असले तरी मला राहवत नाही म्हणून सर्वांच्या पायी आधी दंडवत घालतो. आणि सांगतो की, आपल्या हिताचे काय ते जाणून घ्या आणि तसे वागा. देव म्हणजे काय हो आपल्या जीवाला देव म्हणतात जेथे जीव तेथे शिव तो जसा शुद्ध तसे तुमचे चित्त शुद्ध होईल असे पहा. त्यासाठी फक्त मन एकाग्र करावे लागते. मन एकाग्र करण्यासाठी त्या देवाचे, ज्ञानेश्वरीचे चिंतन वाचन करावे. आपल्या आयुष्यात लाभ काय याचा विचार करा आणि आपल्या मनाचा जो व्यापार चालत असतो तो मी सांगतो आहे. तसा करा असे संत तुकाराम म्हणतात. अजून मी तुम्हाला काय सांगू, अजून काय शिकवू, आयुष्याचा नाश करून घेऊ नका हेच संतांचे सांगणे आहे. हाच मी सांगितलेला उपदेश चित्त शुद्ध करीत न्या तोच व्यापार लाभाचा हे जनाबाई पुन्हा पुन्हा सांगते की, ज्ञानेश्वरीचे वाचन चिंतन अखंड ठेवा. ज्ञानेश्वरी वाचणे व ऐकणे म्हणजे चित्त शुद्ध करीत नेणे. शुद्ध तोची देव असे म्हणा हवे तर तो देव जर सखा झाला तर काय होईल ते तुम्हाला एक प्रल्हादाचा दृष्टांत सांगतो. असे ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर म्हणतात, प्रल्हादावर केवढा प्रसंग आला होता. पण त्याने मनात देवाचे चिंतन शुध्द भाव ठेवून केले होते. असा जो मनुष्य असतो त्यावर अवघे जग कृपा करते. प्रल्हादाला असा अनुभव आला की, अग्नीची बाधाही त्याला होऊ शकली नाही. अवघे जग ज्याच्या मागे त्याला कशाची भीती? त्याची काळजी करणारा हरी प्रल्हाद संकटातून जसा बाहेर पडला तसे तुम्हीही संकटातून मुक्त व्हाल. हे सर्व माहीत असूनही अनेक जण कासावीस होतात. ते का बरोबर आहे म्हणून संत तुकाराम तुम्हाला सांगतात की, तुम्ही त्यासाठी प्रयत्न करा देवाचे, हरीचे चिंतन अविरत करून चित्त शुद्ध करणे. हा व्यापार सोडू नका हे बघा मी हे जे सांगतो आहे. त्याला हसणारे भरपूर आहेत. त्याला चूक म्हणणारे आहेत. असू देत आपण तसे असू नका हो. पुढे संत तुकाराम सांगतात, आंधळ्याची जन अवघेची आंधळे। आपणासी डोळे दृष्टी नाही।। रोग्या विषतुल्य लागे हे मिष्टान्न। तोंडासिक कारण चवी नाही।।

तुका म्हणे शुद्ध नाही जो आपण। तया त्रिभुवन अवघे खोटे।। दुसऱ्याला डोळे आहेत हे आंधळ्याला कसे कळावे त्याच्यासाठी सारेजन दृष्टिहीनच ना? तसे आपले होते प्रल्हादाची कथा कोणाला माहित नाही. पण हवा तो योग्य वेळेत बोध होत नाही असे का? आपल्याला डोळे आहेत पण दृष्टी नाही. हे त्याचे कारण. रोगी माणसाला मिष्टान्न नकोसे वाटते. कारण त्याच्या तोंडाची चव गेलेली असते. मी सांगतो विषयाचे असेच होते ज्याचा मनोव्यापार शुद्ध नाही त्याला मी सांगतो. तो विचार पटेल कसा? देहाचा रोग मिष्टान्न नाकारतो आणि मनाचा रोग योग्य विचर नाकारतो. अशुद्ध मनाच्या व्यक्तीला आपल्यासारखे जग खोटे वाटते त्याला काय करणार म्हणून अशा लोकांपासून सावध होऊन ज्ञानेश्वरी वाचा. संत ज्ञानेश्वर म्हणतात, पाहे पां दूध पवित्र आणि गोड। पासि त्वचेचिया पदरा आड। परी ते अव्हेरून गोचीड। अशुद्धचि सेवी।। ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायात भगवंत अत्यंत गुहय असे ब्रह्मज्ञान आपल्याला अंत:करणातील गोष्ट सांगतात. कारण अर्जून स्वतः ज्ञान प्राप्तीच्या इच्छेची मूर्ती आहे. हे स्वरूप ज्ञान सर्व विद्यामध्ये श्रेष्ठ आहे. यावर अर्जून शंका व्यक्त करतो की, अशी ज्ञानासारखी वस्तू लोकात अनुभव घेतल्याशिवाय कशी राहिली. याचे उत्तर देताना धर्मावर श्रद्धा ठेवणाऱ्या पुरुषाचे वर्णन करताना भगवंत म्हणतात, दूध हे पवित्र आणि गोड असून जवळच त्वचेच्या पदराआड गोचीड आहे. तरी ते सोडून रक्त पीत नाही काय? किंवा कमळ आणि बेडूक यांची वस्ती एकाच ठिकाणी आहे कमळातील परिमल दूरचे भुंगे येऊन सेवन करतात; पण बेडकासाठी चिखलच असतो. दुर्दैवी पुरुषाच्या घरात हजारो मोहरा पुरलेले आहेत; परंतु अज्ञानाने तो त्यावरच बसून दारिद्र्यात जीवन घालवतो. याचप्रमाणे सर्व सुखांचा बगीचा असा भगवंत तो सर्वांच्या हृदयात असताना त्या मला न जाणून मूर्ख लोक सुखाकरता विषयांची इच्छा धरतात. म्हणून जन्म, मरण रूप धुतड्या नदीत गटांगळया खात राहतात. काय अयोग्य आणि काय योग्य आहे हे संत जनाबाई सांगतात. वाचावी ज्ञानेश्वरी जनाबाई आपले जीवन चांगले जावे म्हणून सांगतात. आपली बुद्धी न चालवणं हे शहाणपण आहे. प्रपंचात आपण आपली बुद्धी चालवतो म्हणून शहाणा. तर परमार्थात आपली बुद्धी चालवत नाही म्हणून शहाणा जो ज्ञानोबा, तुकोबारायांचे ऐकतो तो शहाणा स्वामी अखंडानंदजी म्हणतात-माणूस जर संतांनी निर्माण केलेल्या शास्त्राच्या मार्गावरून गेला तर त्याला फार लवकर देव भेटेल. आपण आपली बुद्धी चालवतो म्हणून सर्व मुसळ केरात गेले म्हणून समजा. म्हणून परमार्थात आपली बुद्धी चालवायची नाही.

भगवद्गीतेतील पहिल्या व दुसऱ्या अध्यायात अर्जूनाने आपली बुद्धी चालवली आणि मोहात पडला. तेव्हा भगवंताने काय केले हे संजय पुढील श्लोकात सांगत आहेत. एवमुक्तो ऋषिकेशो गुडाकेशन भारत। सेनयोरूभयोर्मध्ये स्थापयित्वा रथोत्तमम्।। भष्मद्रोणप्रमुखत: सर्वेषां च महिक्षिताम। उवाच पार्थ पश्यैतान्समवेतान्कुरूनिती।। गीतेचा वक्ता श्रोता विषय आणि प्रगटीकरणस्थान सारेच अद्भूत आहे. कौरव पांडवांच्या सेना युद्धासाठी सिद्ध होऊन समोरासमोर येऊन उभ्या टाकल्या असताना अर्जूनाने आपल्या सारथ्याला अर्थात श्रीकृष्णाला आपला रथ दोन्ही सैन्यांच्यामध्ये उभा करण्यास सांगितले. सेनयेरूभयोर्मध्ये रथं स्थापत्य मेडच्युत ।। २।। अ.१ ।। त्याप्रमाणे रथ उभा झाल्यावर, अर्जूनाने जेव्हा समोरच्या सर्व सेनेवरून दृष्टी फिरवली तेव्हा त्याला युद्धासाठी उद्यत असलेले आपले आजोबा, आचार्य काका, मामा आणि अन्य गुरुजन दिसले भाऊ, भाचे, पुतणे, मेहुणे, आप्त इष्ट, सगेसोयरे आणि इतरही अनेक जण प्रियजन त्याला दिसले. त्याच्या मनात विचार आला या सगळ्यांना मारून त्यांच्या रक्तात भिजलेली राजवस्त्रे आम्ही अंगावर धारण करणार की काय? त्यांच्या प्रेतांच्या पायघड्या करून सिंहासनाच्या पायऱ्या चढणार की काय? या कल्पनेने अर्जुनाच्या अंगावर शहारे आले आणि त्याचे मन गांगरले. नको हे युद्ध आणि नको ते राज्य असे त्याला वाटले. त्याने आपल्या हृदयातील व्यथा श्रीकृष्णाला सांगितली. त्याच्या हातून गांडीव धनुष्य गळून पडले. तो रथाखाली उतरला आणि जाऊ लागला. तेव्हा भगवान श्रीकृष्ण त्याला म्हणाले, थांब तू जातोस कुठे? अरे तू कोण आहेस आणि तुझे कर्तव्य काय याचा आधी नीट विचार करशील की नाही? कुतस्वा कश्मलमिदं विषमे समुप्रस्थितम। अनार्यजुष्टमस्वर्ग्यम्कीर्तिकरमर्जून ।।२।। अ. २ ।। अर्जुना काय रे हे वेडेवाकडे तुझ्या मनात आले आहे? आणि कोणत्या विचित्र वेळी? अरे यामुळे स्वर्ग तर जाईलच पण इहलोकीही अपकीर्ती पदरी येईल. ज्ञानेश्वर महाराज ज्ञानेश्वरीत म्हणतात, म्हणे अर्जुना आदी पाही। हे उचित काय इये ठायी। तू कवण हे कायी। करीत आहासी।। यानंतर जे प्रश्न उपप्रश्न विचारले गेले जी उत्तरे दिली गेली आणि त्यानिमित्ताने

कृष्णार्जूनांचा जो संवाद झाला. त्यालाच आपण गीता म्हणतो. मी कोण आहे? माझी कर्तव्य काय आहेत? या मनुष्याच्या कायम घसरण्याच्या जागा आहेत. या दोन गोष्टीचा घोटाळा झाल्यामुळे मानवाचे अध:पतन झाले आहे. यांच्या विस्मरणामुळेच मानवाच्या हातून नानाविध अनाचार, भ्रष्टाचार, पापाचार घडतात. मी कोण आहे? आणि माझे कर्तव्य काय आहे? याची जाणीव आपल्याला ज्ञानेश्वरी करून देते. म्हणून संत जनाबाई वाचावी ज्ञानेश्वरी। डोळा पाहे पंढरी।। असे म्हणते.

ज्ञानेश्वरी, गाथा आपल्यासमोर असताना आपली बुद्धी का चालवावी? परमार्थात आपली बुद्धी चालवायची नाही. कर्मविपाक सिद्धांत सांगतो कर्मातून अपूर्व निर्माण होते. कोणत्या कर्मातून अपूर्व निर्माण होते. हे आपण सांगू शकतो का? आपल्याला वाटते आम्ही पुण्य कर्म केलो पुण्य कर्म केलो असे सांगत फिरतो. ह.भ.प. चैतन्य महाराज दृष्टांत सांगतात, पेपर वाचताना एक पाल किडा खाण्यासाठी येत. ते पाहून आपण किडयाचा जीव वाचवतो. आपल्याला वाटते किड्याचा जीव आपण वाचवला आपण पुण्य कर्म केले असे वाटते असा भास होतो पालीच्या मुखातला किडा हुसकावून घातला हे खरे तर पाप आहे; पण आपण त्याला पुण्य कर्म म्हणतो. मला सांगा दुसऱ्याच्या मुखातला घास हिरावून घेणे हे पाप नाही का? हे पाप आहे का? पुण्य आहे. म्हणून आपली बुद्धी हितअहितासाठी वापरायची नाही. जगामध्ये असा एकही विषय नाही की ज्ञानोबा, तुकोबांच्या गाथेत नाही असे मला काढून दाखवा. संतांनी प्रथम पाहिले, अनुभव घेतले, नंतर सांगितले. संत जनाबाईला ज्ञानेश्वरी वाचण्याचा अनुभव आला म्हणून साऱ्या जगाला ओरडून सांगतात. जनाबाई, नामदेव सांगतात ज्ञानेश्वरी कळत नसली तरी वाचावी व ऐकावी याच्या विरोधात एकनाथ महाराज सांगतात. भाव धरूनिया वाची ज्ञानेश्वरी। कृपा करी हरी तयावरी।। स्वमुखे आपण सांगे तो श्रीविष्णू। श्रीगीता हा प्रश्नु अर्जुनेसी।। तोचि ज्ञानेश्वरी वाचे वदता साचें। भय कळीकाळाचे नाही तया। एका जनार्दनी संशय सांडूनी। दृढ धरी मना ज्ञानेश्वरी।। आम्हाला ज्ञानेश्वरी कळत नाही म्हणून आम्ही वाचायचे व ऐकायचे सोडून दिले. ज्ञानेश्वरी उपासनेचा व अभ्यासाचा ग्रंथ आहे. संत तुकाराम म्हणतात- जवं हे सकळ सिद्ध आहे। हात चालावया पाय। तंव तू आपले स्वहित पाहे। तीर्थयात्रे जाय चुकू नको। तुका म्हणे धावा आहे पंढरी विसावा करा करा लागपाठ धरा पंढरीची वाट। जव नाही चपेट। तो सोयरा दिनाचा पंढरीसी जावे सर्व सुख घ्यावे। रूप ते पहावे विटेवरी।। संताच्या धर्मावर आपली श्रद्धा असावी. करुणा, शांती आपल्या अंगी बिंबव असे ज्ञानेश्वर सांगतात विचार करायला वावच आपल्याला ठेवला नाही. हे तर विचार आपल्या हातात संतांनी ठेवला त्यांच्या वाङ्मयातून बोलतात. परमार्थात आपली बुद्धी चालवायची गरज नाही. संतांनी सांगितले आहे म्हणून ज्ञानेश्वरी वाचावी. आईच्या मनात वासल्य निर्माण होत असेल तर मुलांनी आईचे ऐकावे म्हणून संतांनी सांगितले वाचावे तीर्थयात्रा करावी आत्ममग्न व्हावे. संत आपल्यासाठी देह झिजवितात, आपल्या कल्याणासाठी झिजतात. संत सांगतात म्हणून वाचावे का वाचावी? कारण वाचत गेल्याशिवाय कळत नाही पहिल्यांदा मुलगा अ, आ, इ, ई, हे शब्द कळत नसतील तरी पाटीवर गिरवतोच की नाही नंतर त्याला स्वर आहेत याचे ज्ञान मिळते. त्याप्रमाणे हळूहळू ज्ञानेश्वरी कळेल. ज्ञानेश्वरांनी जगताच्या विश्वाच्या कल्याणासाठी आता विश्वात्मके देवे येणे वाग्यज्ञे तोषावे लिहिले आहे. ते एकाएकी कसे कळेल? ज्ञानेश्वरी विचार करते की मला हा वाचत असेल तर याला वाचवले पाहिजे असे सांगते. ती कृपावंत आहे, कृपाळू असतात ते आपल्या अंत:करणात, पोटात घेतात ज्ञानेश्वरांना सनातन्यांनी वाळीत टाकले पण ज्ञानेश्वरांनी बदला म्हणून एकाला तरी वाळीत टाकले का सांगा स्वत: ज्ञानोबाराय आपल्याला समजून घेऊन समजावत असतात. ती माऊली आहे. ज्यांनी वाळीत टाकले त्यांनाही जीवन मुक्त केले. (विसोबा खेचर, चांगदेव) ब्रह्मज्ञानी केले. मानसशास्त्रात कामात कृतीचा संबंध आहे. वाचायचा प्रयत्न करा आपोआप हळूहळू कळेल. वाचन करतो म्हणजेच ज्ञानेश्वरी कळणे होय. पुढे चैतन्य महाराज दृष्टांत देतात. महाराजांनी सांगितले की, कीर्तन संपेपर्यंत दोन पोते बटाट्याची भाजी करा. दोन पोते बटाटे सोलून लगेच भाजी करायची आहे. हे साधे समजू नका. महाराजांचे कीर्तन संपत आले आहे. ज्ञानेश्वर माऊली भजन घेतले आहेत. मग एवढ्या अर्जंट दोन पोते बटाटे सोलण्याचा उपाय काय करणार सांगा. आता पर्याय एकच पहिला बटाटा सोलायला घ्या असे मानसशास्त्र सांगते त्याप्रमाणेच ज्ञानेश्वरी वाचण्याचा उपाय हाच आहे. पहिली ओवी आता तरी वाचायला घ्या. ज्ञानेश्वरी समजत नाही तरी वाचा आपल्याला सगळं कळतं आणि एवढंच कसं कळत नाही. नोटाबंदीच्या

काळात नोटा बदलून घ्यायचे कळाले की नाही सांगा. या काळात गरीब लोकही श्रीमंत झाले. ते त्यांना कळाले. बटाटयाची भाजी कशी खावी कळते. आम्हाला जे आवडतं, आवडत नाही त्याचा त्याग करण्याचे आपल्याला कसे कळते. एखादा आवडता पदार्थ पंक्तीत आला तर वाढप्याला समोरून जाऊ देत नाही. जेवण माणसाला जशी जिवंत ठेवील हो पण ज्ञानेश्वरी आपल्यातल्या मनुष्यात्वाला जिवंत ठेवील. म्हणून मी जेवण्याचे उदाहरण दिले आहे. त्यामुळे ज्ञानेश्वरी वाचावी असे जनाबाई सांगतात. ज्ञानेश्वरी उपासनेचा ग्रंथ आहे, अभ्यासाचा ग्रंथ आहे. काव्यप्रकाशाचे पारायण काय मिळते. तर तो ग्रंथ फक्त अभ्यासण्याचा आहे तो ग्रंथ उपासनेचा नाही. मम्मटाने काव्यप्रकाशात संपूर्ण आयुष्य घालवले. डोक्याचे काम आहे. इतके वर्ष मेहनत करून लिहिलेला ग्रंथ आहे. गुरुसमोर बसून अध्ययन करण्यासारखा ग्रंथ आहे. विचार सागर अभ्यासण्याचा ग्रंथ आहे. भीष्मस्तवराज, हनुमानतिलक, रामरक्षा उपासनेचा ग्रंथ आहे. पुढे चैतन्य महाराज म्हणतात, संत एकनाथाकडे एक माणूस गेला आणि म्हणाला महाराज उपासना कशी करावी ते मला. सांगा नाथांनी म्हटले विष्णुसहस्त्रनाम घे त्या माणसाने विष्णुसहस्त्रनाम घेण्यास सुरुवात केली. त्या माणसाला स्वप्नि, जागृती विष्णू सहस्त्रनामाची इतकी सवय लागली की, तो एका दिवसी मेला त्या मेलेल्या माणसाला आंघोळ घालायला सुरुवात केली. पहिला तांब्या घातला की, विष्णुसहस्त्रनामाचा आवाज त्याच्या शरीरातून अंघोळ घालणाऱ्यांना ऐकू येऊ लागला. त्यांना वाटू लागले की, हा मुडदा नसून जिवंत आहे, बोलत आहे नाथांकडे सर्व लोक गेले नाथांनी म्हटले, विष्णूसहस्त्रनाम संपले की, अग्नी द्या म्हटले. म्हणून ज्ञानेश्वरी हा उपासनेचा ग्रंथ आहे, प्रतिपाद्य विषयाबद्दल पुन्हा पुन्हा सांगणे हा अभ्यास आहे. तर उपासनेत एकच स्त्रोत्र पुन्हा पुन्हा म्हणणे म्हणजे या उपासनेत भाव संधान आहे. शिवलीलामृत भाव ठेवून वाचावे. ज्ञानेश्वरी ही भाव धरूनिया वाचावे. भाव अक्षराची गाठी। वरी श्रीकृष्ण जगजेठी।। ज्ञानेश्वरी पारायणाला बसलो आणि पाहिली ओवी ही वाचता येत नाही तरीही वाचावे. जिथे जीभ अडखळली तरीही चालेल नातरी बालक बोबडा बोली। का वाकोडा विचुका पाऊली। ते चोज करुनी माऊली। रिझे जेवी म्हणून जनाबाई म्हणतात कळत नसले तरी ज्ञानेश्वरी वाचावी.

वर्षभर पारायण झाले, तीन वर्षे लागले ६५ ओव्या वाचण्यास मग बिघडले कुठे? हळूहळू वाचत गेले की, शब्दांची सवय झाली की, शब्दावर स्वारस्य वाटायला लागते. नंतर शब्दांची सवय होते. ज्ञानेश्वरीच्या शब्दावर एकबार प्रेम झाले की, ते प्रेमच ज्ञानोबाच्या चरणाजवळ घेऊन जाते आणि ज्ञानोबाच्या चरणाच्या कृपेनेच ज्ञानेश्वरी कळते. उदाहरणार्थ लहान मुलगा 'र' चा उच्चार करता येत नाही 'र' ला 'लद्ध म्हणतो. राम म्हन म्हटले की, लांब म्हणतात. लांब शब्दाला काहीही अर्थ नाही. मग सुरुवातीला रामाला लांब म्हणतो आणि आपण पाहुण्यांना सांगतो आमचा बाळू आता राम म्हणत आहे. मग पाहुणे बाळूचे कौतुक करतात हळूहळू बाळूचे वय वाढत जाते. बाळूचे पंधरा वर्षे झाले. लांबच का बाळू रस्त्याने वाकडा येऊ लागला. मग आई त्याला चांगलाच चोप देईल का नाही. अहो कधीतरी तो राम म्हणेल. म्हणून ज्ञानेश्वर म्हणतात, बालक बोबडा बोली। का वाकुडा विचुका पाऊली। ते चोज करूनि माऊली। रिझे जेवी।। अहो सानिध्य निर्माण झाले की, प्रेम निर्माण होते. चाडांल आणि कुत्रा एकत्र सहवासाने राहतात. (महाभारत) सहवासाचे प्रेम असते. चांडाल म्हणजे कोण? जो कुत्रा शिजवून खातो तो चांडाल होय. कुत्र्याचा तो शत्रू, वैरी आहे. तो चांडाल कुत्र्याचा वैरी असल तरी वैरी आहे. पण सहवासाने एकत्र नांदतो. ज्ञानेश्वरीच्या शब्दांचा सहवास झाला, तर शब्द आपल्यासोबत राहणार नाहीत का? म्हणून वाचावी ज्ञानेश्वरी हे झाले भावनिक चिंतन.

कशाकरिता ज्ञानेश्वरी वाचावी? ज्ञानेश्वर भगवद्गीतेचे चिंतन सांगतात. भगवान म्हणतो जो कोणी वाचत असेल तर माझ्यासाठी केलेला हा ज्ञानयज्ञ असेल. पठणाचे, चिंतनाचे फल काय? श्री ज्ञानदेवासारखे वैष्णव नेहमीच अतिशय विनयाने पण तेवढयाच आत्मविश्वासाने, श्रवणातून ब्रम्हरसाचा आस्वाद घ्यावा. याचा परिचय करून देत असताना श्रोत्यांचा अनुनय करतात. वक्ता तो वक्ता नव्हे। श्रोतेविण।। यात वक्त्याचे समाधान आणि श्रोत्यांचे अवधान सतत उत्सुक आणि उत्साहपूर्ण आहे संवादातील वातावरण सदैव ताजेतवाने आहे. तोंड भरून विचारावे असे अर्जुनासारख्या श्रोत्याला वाटते आणि कान ओसंडून वाहतील इतके बोलावे. असे भगवान श्रीकृष्णाला वाटते. आणि वक्ता व श्रोता यांच्या परस्परामधील प्रेमामुळे, भक्तिमुळे कधीकधी विषयांतराचा, पुनरूक्तिचा तसाच

पाल्हांळांचा भागही रूचिने बोलला, ऐकला जातो. चातकाचियेकणवे। मेघु माणियेंसी धावे। तेथ चराचर आघवे। निवाले जेवि।। अशी वाचकाची अवस्था होते. स्वत: आत्मतृप्तीने निवून श्रीगुरू थांबले नाहीत तर त्यांनी वाचकांनाही स्वानंदसाम्राज्याचा चक्रवर्तीत्व बहाल केले आहे. मने काये वाचा। जो सेवकु होईल इयेचा। तो स्वानंद साम्राज्याचा। चक्रवर्ती।। चक्रवर्ती म्हणजे सर्व राजांचा मालक होय. म्हणून मन, वाणी, काया या तत्वांनी ज्ञानेश्वरी वाचावी मन-शरीर – वाणीने ज्ञानेश्वरी वाचली पाहिजे. मनाने सेवन करणे म्हणजे अखंड चिंतन करणे, कायेने सेवा करणे म्हणजे ज्ञानेश्वरीतील तत्वांना क्रियेने, शरीराने प्रकट करणे. वाणीने म्हणजे अनुष्ठान करणे, पारायण करणे, ज्ञानेश्वरी हाताने लिहून काढणे. महिलांनी ज्ञानेश्वरी लिहून काढावी. टिव्ही., मोबाईल पाहिल्याने, ऐकल्याने जीवनाला दिशा मिळत नाही हाताने लिहिली की कायिक सेवा आणि वाणिने वाचले की वाचिक सेवा घडते. त्याचे फल काय म्हणाल तर स्वानंदसाम्राज्याचा चक्रवर्ती आनंदाचा आनंद अधिपती होतो. त्याला मोक्ष मिळतो. ‘‘श्रवणे, पाठय (पठण) गीत, नेती मोक्ष’’ पुन्हा संत नामदेवाचा अभंग आठवावा गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी। ब्रम्हानंद लहरी प्रकट केली।। अध्यात्म विद्येचे दाविलेसे रूप। चैतन्याचा दीप उजळला।। छपन्न भाषेचा केलासे गौरव। भवार्णवी नाव उभारिली।। श्रवणाचे मिसे बैसावे येऊनी। रामराज्य भुवनी सुखी नांदे।। नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ। एक तरी ओवी अनुभवावी।।

अशा पद्धतीने ज्ञानेश्वरांनी 56 भाषेचा गौरव करून ज्ञानेश्वरी आपल्याला दिली आहे. ज्ञान झालं की परमार्थाचा बोध झाला मग मोक्ष प्राप्त होते लागोपाठ शंभर ब्राह्मण जन्म प्राप्त होऊन त्या त्या जन्मात जो ब्रह्मकर्म करतो तोच काय तो ब्रह्मदेव होतो दुसरा कोणी होत नाही. नाना सूर्याचा प्रकाशु। लाहे जेवी डोळसु।। तेवि ज्ञानेंचि सौरसु। मोक्षाचा तो।। ज्याप्रमाणे डोळसालाच सूर्यप्रकाशाचा लाभ घेता येतो. त्याप्रमाणेच ज्ञानानेच ज्ञानी पुरुषाला मोक्षाची योग्यता प्राप्त होते. ज्ञातृयोविहिन। नुसधेचि जे ज्ञान। सुखा भरले गगन। गाळीव जे।। (ज्ञा.७७) ज्ञानेश्वरी वाचता वाचता मोक्ष मिळते ज्ञान कोण देते तर गुरु देतात मग ज्ञानेश्वर गुरुच आहेत. गीता ज्ञानापर्यंत आपल्याला आणून ठेवते.

**मोक्षाचा दुसरा अर्थ** स्वानंद साम्राज्याचा कसा होतो. मठ, बुद्ध, मुमुक्षु असो यांनी ज्ञानेश्वरी वाचा सर्वांना मोक्ष हवा आहे. मोक्ष म्हणजे मरण नव्हे. मोक्षाची अपेक्षा माझ्यासकट सर्वांना आहे. मोक्ष म्हटले की, आपल्याला जड वाटते, भय वाटते, मोक्ष हा शब्द वेदातला आहे. बरं तुम्हाला सुख पाहिजे का? असा प्रश्न विचारतो उत्तर सर्वांचे सुख पाहिजे असेच येईल. हे सुख दुःख राहून पाहिजे का जाऊन पाहिजे? सगळे दुःख जाऊनच आम्हाला सुख पाहिजे. दुःख राहून सुख आले तर आपले काय बिघडते? गेलेले दुःख किती दिवसांनी, महिन्यांनी, वर्षांनी परत यावे वाटते? येऊच नये असे कोणालाही वाटते. बरं आता सांगा सुख परत किती दिवसांनी, महिन्याने, वर्षांनी निघून जावे वाटते? जाऊच नये असे वाटणे स्वाभाविक आहे. हीच अपेक्षा आहे. जगामध्ये असा माणूस आहे का? सत्याअसत्यामध्ये गाथेजवळ बसून, नमस्कार करून येथे सात दिवस राहून महाराजांसोबत गोडधोड खाऊन राहतो. शुगर असणारा सुद्धा हेच करतो. अहो माणूस संज्ञा नाकारतो. संकल्पना नाकारू शकत नाही. हेच मोक्ष आहे. माणसाची अपेक्षा मोक्षनिमित्त आहे. मग आपल्याला मोक्ष मिळेल तर तांदूळ, भाजी, दूध बाजारातून किलोने मोजून आणतो. पण कोणीतरी आजपर्यंत दोन किलो मोक्ष विकत आणल्याचे उदाहरण सांगा. मोक्ष मिळवणे इतकं सोपं आहे का? तुम्ही फक्त एकच करा नियमित साधना करा साधनेचं सातत्य ठेवा, विश्वास ठेवा, मर्यादा बघा आणि ज्ञानेश्वरी वाचा. हे करता करता आयुष्य संपले तरी कधी तुम्ही नामस्मरण वाचन करणार. मोक्षाचा अधिकारी आपण सर्वच आहोत. नुसती अपेक्षा ठेवून होत नाही. मला पंतप्रधान होण्याची अपेक्षा आहे. हे सोपं आहे का? कष्ट करावे लागतील, प्रारब्धाची जोड हवी. ब्रह्मज्ञान मिळवण्यासाठी खूप कष्ट करावे लागतात. चांगलं कोणतं वाईट कोणतं हे माणसाला ओळखता यावं माणसाच्या जीवनात पश्चाताप येतो. तेव्हा अविवेक होतो त्यावेळी आपला विवेक झोपला होता. सारासार विवेक जागा नव्हता असे म्हणून बोलून दाखवते. प्रपंचात पश्चाताप अनेक वेळेला होतात. अशी वेळ माणसावर का आली तर आपल्याला विवेकच माहीत नव्हता. संताकडे विवेक आहे. विवेक व वैराग्याला घेऊन मुमुक्षता घेऊनच श्रवण करायचे आहे. मग नंतर मोक्ष आहे. जोपर्यंत आपल्याला ब्रह्मज्ञान होत नाही तोपर्यंत वैराग्य अंगी येत नाही. साठ वर्षाची तपश्चर्या एका अप्सरेच्या नादाने मातीमोल झाली. वैराग्य तर फार अवघड आहे. महानुभाव संप्रदाय सांगतो ज्ञानेविन वैराग्य कायी करावे। वैराग्यविना ज्ञान कायी

करावे।। संत एकनाथ म्हणतात, त्याग म्हणजे गंगा स्नान नव्हे। त्याग म्हणजे जप, तप, तीर्थ नव्हे। तर त्याग म्हणजे वासनेला पळवून लावणे. वैराग्य तर निसटतं आहे जो विषयाच्या मागे धावतो तयाची इंद्रिय भांबावतात. प्राणी सुद्धा हिरवा चारा पाहिला की, भांबावून जातात. ज्ञानेश्वरी अध्याय पहिला. ज्ञानेश्वरांनी खूप गोड चिंतन ज्ञानेश्वरीत केले आहे. म्हणून जनाबाई म्हणते, वाचावी ज्ञानेश्वरी। डोळा पहावी पंढरी। मोक्ष मिळवायचे असेल तर भगवंत कृपा आवश्यक आहे. भगवदकृपा मिळवणे अवघड आहे तर त्यांनी ज्ञानेश्वरी घरोघर विकत घ्या आणि वाचा ज्यांच्या घरी नाही गाथा। त्याच्या कपाळी मारा लाथा। एवढे जरी आपल्याला कळाले, तर बस सार्थक झाले म्हणून आपण नित्य ज्ञानेश्वरीचे वाचन करावे.

मला संसाराने बध्द केले आहे असे व्यास मुनी म्हणतात. त्यांना त्यांचाच मुलगा शुक्राचार्य म्हणतो, बाबा संसार सुटला का हो. मला संसार म्हणजे काय चांगलच ओळखू येतो. तू माझा मुलगा आहेस त्यामुळे तुला संसार कळाला. व्यास म्हणाले माझा संसार सुटलेला नाही. माझा तुमच्या शब्दावर अजिबात विश्वास नाही. संसार ज्याच्या ताब्यात आहे त्यांनी सांगावे. अरे तुझा मी बाप आहे. तेव्हापासून मुलगा बापावर विश्वास ठेवत नाही. श्रीकृष्ण म्हणाले संसार माझ्या ताब्यात आहे. व्यासांना संसार सुटला नाही मग तुमचे माझे काय संसार भवरोग आहे. तो पीडित आहे. या जुनाट भवरोगावर एकच उपाय आहे, तो म्हणजे विचार. हे एवढेच औषध आहे. संसाराचे आणि विचाराचे कधीच पटत नाही. विचार न करणारे आपण प्रपंचात आहोत. विचार करणारे प्रपंचात राहणार नाहीत असे ज्ञानेश्वर म्हणतात. ज्ञानेश्वरी अध्याय दुसरा चिखलातील बेडूक विष्ठेतील किडा होणे चांगले आहे. अंधाऱ्या गुहेतला साप होऊन जगणं चांगलं आहे पण माणूस म्हणून विचार न करणं चांगलं नाही. (योग वशिष्ठ) अर्जुन का मुक्त झाला भगवंताने प्रवचन सांगितले म्हणून तो घरला गेला, विचार केला, त्याला प्रश्न पडला म्हणून बुद्धीत प्रकाश पडला. अर्जुनातील क्षेत्रीयत्व विचार श्रीकृष्णाने ओळखले होते म्हणून विचार करा ज्ञानेश्वरी वाचणाऱ्यांना विचार देते. देह परमात्मा काहीच देत नाही. असे वाटेल की, ज्ञानेश्वरी वाचून कोणी मुख्यमंत्री होत नाही. अहो वाचला नाही म्हणून तर तो मुख्यमंत्री झाला. वाचला असता तर वारकरी झाला असता. एखाद्याने मरायला दोन वर्ष राहिले तेव्हा ज्ञानेश्वरी वाचायला लागला, म्हणून त्याचा मृत्यू टळला का? ज्ञानेश्वरी ऐश्वर्य, सत्ता, धन देत नाही. पण विचार करायला नक्कीच लावते. ज्ञानेश्वरी वाचनाने माणसाला दृष्टी प्राप्त होते. ज्ञान देह अस्तित्व सत्ता जगातला प्रत्येक पदार्थ परमात्मा रूप आहे. ती आनंद रुपी सत्ता कुणाच्या ठिकाणी नाही. आपल्या आयुष्यात कधीच समाधानाचा क्षण आला नाही. असा माणूस जगात नाही का? आमचं अस्तित्व म्हणून काही आहे का नाही तुम्ही आम्ही चेतन आहोत चैतन्याची सत्ता आहे जडत्वाची सत्ता आहे नारळाला फोडण्याची सत्ता दगडात आहे. माणसाचं मानसशास्त्र मोठ विलक्षण आहे. उदाहरणार्थ सर्व एसटी भरलेली असताना माणूस आत घुसतो, घुसला की, आता दुसरा आत येऊ नये म्हणतो मध्ये गेला की, तेवढेही गर्दीत जागा शोधतो आणि बरोबर आहे. एखाद्या एका माणसाच्या सीटवर बाजूला एक पाच रुपयाचा रुमाल ठेवलेला असतो. समजा एखाद्या ह.भ.प. महाराजाला बसू देत नाही. सत्ता आहे की नाही. आता सांगा आपली सत्ता आहे याची जाणीव नाही पाच रुपयाच्या रुमालाची तेवढी सत्ता. मग आपण तर माणूस आहोत म्हणून ज्ञानेश्वरी वाचा. संत तुकाराम म्हणतात अनुरेणिया थोकडा। तुका आकाशाएवढा।। गिळून सांडिले कलेवर। भव भ्रमाचा आकार।। सांडिली त्रिकुटी। दीप उजळला घटी।। तुका म्हणे आता। उरलो उपकारापुरता।। संत तुकाराम आत्मज्ञान झाल्यानंतर ज्या अवस्थेचे वर्णन करतात तुकाराम ही व्यक्ती म्हणून अगदी नगण्य आहे. म्हणून अनुरेणू या थोकडा अनुपेक्षाही क्षुल्लक पण आता आत्मज्ञान झाल्यावर आपण म्हणजे ब्रह्म कळले म्हणून आकाशाएवढा अमेय झाला. आम्ही कोण आहोत हेच आपल्याला कळत नाही. आपण कधी विचारच करत नाही. तुम्ही कोण म्हटले की, मी कलेक्टर, मी डॉक्टर, मी मुख्यमंत्री, अधिकारी म्हणतो; पण मी ब्रह्म आहे असे म्हणत नाही. सत्तेची जाणीव आपल्याला नाही हे ज्ञानेश्वरी आपल्याला शिकवते. दृष्टांत एक गुराखी शेळ्या मेंढ्या घेऊन जंगलात चरण्यासाठी घेऊन जायचा एके दिवशी त्याला एक सिंहाचे पिल्लू दिसले तो सिंहाचे पिल्लू घरी घेऊन जातो. सगळेजण शेळ्यातील सिंह आहोत. ज्ञानेश्वरी ग्रंथ मात्र जंगलातील सिंह आहे. म्हणून डरकाळी फोडते म्हणून आपण कोण आहोत ही ओळख आपल्याला ज्ञानेश्वरी करून देते. आत्मस्वरूपाचे ज्ञान प्रश्न अर्जुनाला करून देतात आत्म्याच्या ठाई ज्ञानेश्वरी

वाचल्याने काय मिळते, तर विचार मिळवून विचार प्रवृत्त आपण बनतो. असे ज्ञानेश्वरी आपल्याला अंतर्मुख करीत असेल तर जनाबाई म्हणते वाचावी ज्ञानेश्वरी, तुकोबा ज्ञानोबा विचार करायला सांगतात. निदान आता तरी करा विचार सारासार देव संत यांचे विचार ऐकून घरी गेल्यानंतर किती लोक विचार करतात ज्ञानेश्वरांनी हेच तर सांगितले आहे; परंतु एखाद्यालाच विमान घेऊन जायला येते एकच मुक्त का होते ज्याचा संगचित्ती। तुका म्हणे तो त्या .... तो जे पाहतो, वाचतो, ऐकतो अनुभव पण किती जण तत्व मसी झाले. कीर्तन ऐकतात सगळे पण मनन, चिंतन विचार करणारे कमीच असतात. सांडूनिया देई संसाराची बेडी कीर्तनाची गोडी धरावी गा।। तुकाराम संसारात अशी बंधनं बेड्या असतील तर ती तोडून वाईट विचार वाईट कर्म वगैरे सर्व सोडून देऊन कीर्तनाची गोडी अंगी बानावी. ज्ञानेश्वरी का वाचावी विचार करण्याची सवय लागावी म्हणून वाचावी ज्ञान हो मुढा। मूर्ख अति त्या दगडा। असं का बरे जनाबाईंनी म्हटले असावे जनाई म्हणाली अगं एखाद्याला वाटेल की ज्ञानेश्वरी काही आपल्याला कळणार नाही बाबा असं म्हणून जर त्याने वाचलीच नाही तर त्याला ज्ञानोबाचे सानिध्य कसे मिळेल. ज्ञानोबांनी सांगितलेले ज्ञान कसे मिळेल म्हणून जरी एकदा वाचून कळली नाही तरी परत परत वाचावी. ज्ञानोबांच्या ठिकाणी भाव ठेवून वाचावी म्हणजे मग ज्ञानोबा स्वतः अशा माणसाला समजावून सांगतील आणि मग त्या व्यक्तीला मोक्षाची वाट दाखवणारं ज्ञान मिळेल कारण ज्ञान होय अज्ञानासी। ऐसा वर त्या टीकेसी। असा आहे ना जनाबाईचं म्हणणं अगदी खरं आहे. एकनाथ म्हणतात भाव धरोनिया वाचे ज्ञानेश्वरी। कृपा करी हरी तयावरी।। स्वमुखे आपण सांगे तो श्रीविष्णू। श्री गीता हा प्रश्नु अर्जुनेसी।। तेचि ज्ञानेश्वरी वाचे वदता साचे। भय कळीकाळाचे नाही तया। एका जनार्दनी संशय सांडोनी। दृढ मनी ज्ञानेश्वरी। याचं कारण काय? तर गीतेमध्ये अर्जुनाच्या प्रश्नांना भगवंतांनी स्वतः उत्तरे दिली. अशा ह्या गीतेवरचे विस्तृत भाष्य म्हणजे ज्ञानेश्वरी हा ग्रंथ म्हणून जे मूढ आहेत त्यांना विचार आलंबन शिकवते. अवलंबनाशी अनन्यता शिकवते आलंबनाशी एकरूप करून जोडते. जो कोणी मूढ असेल मुमुक्षु मुक्त असेल त्यांनीही वाचावी ज्ञानेश्वरी. अलंबनाचे भजन कसे करावे हे ज्ञानेश्वरी शिकवते. मानवी जीवन तत्त्वावर आधारित चालते ते तत्व एकच एक नसते. काही तत्व मागे पडतात काळाने उदीत होतात. काही तत्व परिवर्तन होतात दहा-बारा वर्षांनी दिसलेला मित्रही म्हणतो फार बदललास असे बोलतो हा बदल अपरिहार्यपणे स्वीकारतो की नाही आपण. काहीच न करणारी म्हातारी माणसे गडबडीने बाथरूमचे दार लावून घेतात की नाही. तीन तत्त्वाचा विचार ज्ञानेश्वरीत आहे. कर्म, ज्ञान, भक्ती हे तत्व माणसाला ज्ञानेश्वरी देते हे आपल्याला जोडता येत नाही. नॉलेज ऑन फिंगर टीप सगळेजण आज बोटावर मिळत आहे हे नॉलेज ज्ञान नाही फक्त माहिती मिळेल ज्ञान नाही माहिती व ज्ञान यात खूप फरक आहे. जीवनाला नको असलेल्या अनावश्यक गोष्टींने जीवन माणसाचे व्यापून टाकले आहे. याचा काहीच उपयोग नाही. एकाच्या सभेला दहा हजार माणसे होते अशा गप्पा मारतो त्याचं व त्याच्या बायकोचं भांडण झाले हे माणूस नको ते साठवून ठेवतो. याचा माणसाला काय उपयोग आहे. ही झाली माहिती ज्ञान नाही. कर्म ज्ञान भक्ती वेदा पासून या तीन ही कांडांचा समन्वयाचा लाभ आहे. कर्माला ज्ञानाचे डोळे असावेत. शंकराचार्यांचे भाष्य आणि ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी कर्म ज्ञान भक्ती यांचा समुच्चय सांगते. समन्वय व समुच्चय वेगळे आहे. गुलाबराव महाराजांना समन्वय महर्षी म्हणतात. समन्वय म्हणजे घराचा जिना जिना चढताना मागच्या पायरीचा समन्वय असतो म्हणून ज्ञान कर्म भक्ती यांचा ज्ञानेश्वरी समन्वय साधते. संत एकनाथ वारकरी संप्रदायाचे महाराष्ट्राचे समन्वयकार आहेत. ज्ञानेश्वरी कोण्या व्यक्तीवर बोलत नाही तर वृत्तीवर बोलते. धृतराष्ट्रावर बोलत नाही धृतराष्ट्राच्या वृत्तीवर बोलते म्हणून वाचावी ज्ञानेश्वरी तरी पुत्रस्नेहे मोहितू। धृतराष्ट्र असे पुसतु। म्हणे संजया सांगे मातू। कुरुक्षेत्रीची।। पुत्राच्या प्रेमाने मोहित झालेला धृतराष्ट्र संजय यास म्हणाला संजय या कुरुक्षेत्राचे काय वृत्त आहे ते मला सांग विषयाच्या गाभ्याला हात कसा घालावा. ज्ञानेश्वर सांगतात कीर्तन करणारे लोक सांगतात. गाथेचा अभ्यास केला की, कीर्तन चांगले करता येते. पण ज्ञानेश्वरी नीट वाचल्याशिवाय कीर्तन नीट करता येत नाही. धृतराष्ट्र व अर्जून दोघांनाही मोह आहे; पण अर्जुनाचा मोह निघून गेला हे ज्ञानेश्वरी आपल्याला शिकवते. द्रौपदीचे वस्त्रहरण करणारा एखादा दु:शासन आपल्यात लपलेला आहे. अर्जुनाला भगवान सांगतात चित्त खूप चंचल आहे. शांत चित्ताचा कृष्ण आहे तसाच पांडुरंग आहे. ज्ञानेश्वरी अशा मानवी वृत्तीवर प्रकाश टाकते म्हणून वाचावी ज्ञानेश्वरी असे जनाबाई सांगते. आता तुम्ही सध्या

ज्ञानेश्वरी पारायणाच्या निमित्ताने वाचता पण सप्ताह पूर्ती मर्यादित वाचायची नाही ती अखंड वाचावी असे जनाबाई सांगते. वाचावी ज्ञानेश्वरी। डोळा पहावी पंढरी।। ज्ञान होय अज्ञानासी। ऐसा वर त्या टीकेसी।। ज्ञान होई मुढा। मूर्ख अति त्या दगडा।। वाचील जो कोणी। जनी त्यासी लोटांगणी।। पारायणाने ज्ञानेश्वरी जिवंत ठेवली म्हणून चर्चा सत्र लोकांना घेता आले. पारायण केल्याने माणूस नारायण होतो. ही ताकद ज्ञानेश्वरी वाचनात आहे. ज्ञानेश्वरी वाचन बंद करू नका तर पहिला अध्याय काढून पुढे चालू ठेवण्यासाठी रोज पाच, दहा, शंभर, पाचशे ओव्या वेळ असेल तसे वाचावे म्हणून ज्ञानेश्वरी वाचावी अशी संत जनाबाईंची अपेक्षा आहे. जो कोणी अखंड ज्ञानेश्वरी वाचेल त्याच्या पायावर जनाबाई लोटांगण घालीन असे म्हणतात.

**संदर्भग्रंथ :-**

१) ब्रम्हीभूत वै. साखरे महाराज, 'सार्थ श्रीज्ञानेश्वरी', सरस्वती ग्रंथ भांडार, पुणे, पुनर्मुद्रण,२०००
२) प्र.ग. सहस्त्रबुध्दे, 'आता विश्वात्मके देवे', भारतीय विचार साधना, पुणे, पुनर्मुद्रण, २०१५
३) प.पु. सद्गुरूदास महाराज, 'प्रवचने परिमल भाग १', श्रीगुरुकृपांकित प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१७
४) डॉ. आरती दातार, 'महाराष्ट्रातील संत कवी', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, पुनर्मुद्रण, २०२१
५) ह.भ.प. श्री चैतन्य महाराज देगलुरकर, 'वाचावी ज्ञानेश्वरी। डोळा पहावी पंढरी', प्रवचन भाग १,२,३ (यूटयूब) २८ फेब्रुवारी २०१९, ०२ मार्च २०१९.